SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in,
विद्यार्थी विकास विभाग

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Prof. Dr. R. V. Gurav
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भक्रं. शिवाजीवि / विद्यार्थी विकास / 977 दि. 20 / 07 / 2022

प्रति
प्राचार्य / प्रमुख
सर्व संलग्न महाविद्यालये व
मान्यता प्राप्त शिक्षणसंस्था.

**विषय :– सन 2022–23 युवा महोत्सवासाठी संयोजन प्रस्तावाबाबत.**

महोदय / महोदया,

आपणास विदितच आहे की, यापूर्वी आपल्या विद्यापीठात एकूण 41 युवा महोत्सव अत्यंत यशस्वीरित्या संपन्न झाले आहेत. सन 2022–2023 या वर्षीचा 42 वा युवा महोत्सव साधारणतः खालील कालावधीत आयोजित केला जाणार आहे.

1. **जिल्हा स्तरीय युवा महोत्सव – माहे सप्टेंबर दुस–या आठवडयात**
2. **मध्यवर्ती युवा महोत्सव – माहे सप्टेंबर तिस–या आठवडयात**

सदरील युवा महोत्सवात नाट्य, संगीत, नृत्य इत्यादी विविध सांघिक व वैयक्तिक स्पर्धा आयोजित केल्या जातील. या स्पर्धातील काही स्पर्धा जिल्हा पातळीवर आयोजित करुन त्यातील निवडक स्पर्धकांना मध्यवर्तीयुवा महोत्सवात संधी दिली जाते.

जिल्हा पातळीवरील युवा महोत्सवात एकांकिका, लोकनृत्य, समुहगीत, मूकनाटय, प्रहसिका आणि वादविवाद इत्यादी सामूहिक कला प्रकाराच्या तसेच वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी), सुगम गायन व नकला इत्यादी वैयक्तिक स्पर्धा होतात. तरी आपल्या महाविद्यालयात / संस्थेत वरील स्पर्धासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध असेल तर आपण जिल्हा अथवा मध्यवर्ती युवा महोत्सव आयोजनासाठी आपला प्रस्ताव सोबतच्या तक्त्यात आवश्यक ती माहिती भरुन दिनांक **12 ऑगस्ट, 2022** पर्यंत या कार्यालयास पोहोचेल अशाप्रकारे पाठवावा. ही विनंती.

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

सोबतः– युवा महोत्सव आयोजनासाठी यजमान महाविद्यालयाने भरुन दयावयाच्या माहिती तक्ता.

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थी विकास विभाग
## जिल्हा / मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी यजमान महाविद्यालयाने भरुन द्यावयाची माहिती.
## युवा महोत्सव 2022–2023

1. ( सप्टेंबर दुस–या आठवडयात किंवा सप्टेंबर तिस–या आठवडयात कोणतेही दोन दिवस )

1. महाविद्यालयाचे नांव : ---------------------------------------

2. महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या नाटयगृहाची किंवा प्रेक्षकगृहाची संख्या :

3. नाटयगृहाची किंवा प्रेक्षकगृहाची बैठक व्यवस्थेची मर्यादा :

4. अंदाजे एक हजार विद्यार्थी व विद्यार्थीनींची बैठक व्यवस्था :

   करण्यासाठी खुले नाटयगृह तयारीसाठी जागा उपलब्ध आहे काय ?

5. महाविद्यालयात उपाहारगृहाची व्यवस्था आहे काय? :

6. साधारणतः सहाशे लोकांची भोजनाची व्यवस्था (स्वतंत्र मेस हॉल नसलेस :

   मंडप घालून खुल्या मैदानावर) करण्यासाठी जागा उपलब्ध आहे काय?

7. महाविद्यालयाचे स्वतःचे मुलांचे / मुलींचे वसहतीगृह आहे काय? :

8. साधारणतः 400 विद्यार्थी व 100 विद्यार्थीनी व परिक्षक यांची निवासाची

   सोय महाविद्यालयाच्या परिसरात करता येणे शक्य आहे काय? :

9. महाविद्यालयापासून अग्नीशमन दल व दवाखाना किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र :

   किती अंतरावर आहे?

जिल्हास्तरीय / मध्यवर्ती युवा महोत्सवाचे यजमानपद आमचे महाविद्यालय स्विकारु इच्छिते. युवा महोत्सवाच्या आयोजनास 2022–23 चा जिल्हास्तरीय / मध्यवर्ती युवा महोत्सव **सप्टेंबर महिन्याच्या दुस–या आठवडयात** किंवा **तिस–या आठवडयात** कोणतेही एक किंवा दोन दिवस आयोजित करण्यासाठी आम्ही तयार आहोत.

प्राचार्यांची सही व शिक्का